# VJTI MUMBAI
वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था
Veermata Jijabai Technological Institute
(Autonomous Institute of Govt. of Maharashtra)
H. R. Mahajani Road, Matunga (East), Mumbai - 400 019
Phone:+91 22 24198101/102 • Fax:+91 22 24102874 • www.vjti.ac.in


क्र.लेखा/शिवृ/पं.दि.उ.स्वयम् योजना/२६-२७/३२८१/२०२६ दिनांक : 13 AUG 2026

## शासकीय वसतीगृह प्रवेश
## किंवा
## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना
## (अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता संस्थेतील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या (ST) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर परिपकाद्वारे सूचित करण्यात येते की, शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या तसेच भाडे तत्वावर राहत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहीत्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांकरीता पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना शासनाने सुरू केलेली आहे. सदर योजने अंतर्गत प्रति वर्षी ६०,०००/- इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बॅंक खात्यात थेट शासनामार्फत जमा केली जाईल. सदर योजनेकरीता विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २,५०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असणे बंधनकारक आहे.

तरी, विद्यार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्याकरिता अर्ज करावा. जर वसतीगृह योजनेसाठी निवड न झाल्यास स्वयम् योजनेचा लाभ मिळेल. सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता नवीन (Fresh) तसेचं नुतनीकरण (Renewal) विद्यार्थ्यांनी स्वत: https://swayam.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा व सदर ऑनलाईन भरलेला अर्ज व संबंधीत कागदपत्र त्वरीत शिष्यवृत्ती विभागात आणून द्यावयाचे आहेत. तसे न केल्यास आपण या योजनेपासून वंचित राहील्यास याची सर्वस्वी जवाबदारी विद्यार्थी व पालकांची राहील याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

VEERMATA JIJABAI TECHNOLOGICAL INSTITUTE MATUNGA, MUMBAI -19.

अध्यक्ष
शिष्यवृत्ती समिती

टीप :

१. व्ही.जे.टी.आय. वसतीगृहातील विद्यार्थीसुध्दा या योजनेस पात्र राहतील.
२. M.Tech. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जर विद्या वेतन (Stipend) मिळत नसेल तरच ते या योजनेस पात्र राहतील.

प्रत : सर्व विभागप्रमुख, सुचना फलक, वसतीगृह, ग्रंथालय, टिपीओ, संस्थेचे संकेतस्थळ

## विद्यार्थीना वसतीगृह प्रवेशासाठी किंवा पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना अर्ज सादर करताना विदयार्थ्यांनी घ्यावयाची खबरदारी आणि पालकाचे घोषणापत्र आणि विद्यार्थ्यांचे घोषणापत्र नमुना

१. विद्यार्थीना वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन https://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरुन सादर करावेत, सदर प्रवेश अभ्यासक्रम असलेल्या कालावधीसाठी ग्राह्य असेल, सादर केलेल्या योजनेत अर्ज मंजूर केला असता अभ्यासक्रम संपेपर्यंत योजना बदलता येणार नाही.

**१.१ विद्यार्थीना पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनासाठी थेट स्वतंत्र अर्ज करता येणार नाही.**

**१.२ जर आपली निवड वसतीगृह योजनेसाठी झाली नाही तरच आपल्याला स्वयम योजनेत वर्ग केले जाईल.**

**१.३ वसतीगृहात गुणवत्ता यादी द्वारे निवड झाल्यास विद्यार्थ्यांनी जर वसतिगृहातील प्रवेश निश्चित केला नाही किंवा अर्ज रद्द करून घेतला तर विद्यार्थ्यांना स्वयंम योजनेचाही लाभ मिळणार नाही.**

२. अर्ज सादर करताना तयार केलेला लॉगिन Login id आणि Password कायमस्वरुपी लक्षात ठेवावा, त्यासाठी दैनदिनी मध्ये लिहून ठेवा.

३. लॉगिन केल्यानंतर Aadhar Authentication Status ता Click करून आधार क्रमांक टाकावा आणि आधार प्रमाणीकरण करावे. Aadhar Link साठी OTP येत नसल्यास येत असेल तर आधार सुविधा केंद्रातुन आपले नाव, जन्मतारीख, लिंग, फोटो आणि मोवाईल क्रमांक (शक्य असल्यास ई-मेल आय-डी अदयावत करुन परत लॉगिन करुन Aadhar Authentication Click Aadhar लिंक करने.

४. विद्यार्थीना पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयम योजना किंवा वसतीगृह योजना निवडल्यास प्रथम वर्षाच्या विद्यार्थीना New पर्याय निवडावा.

५. ऑनलाईन अर्ज सादर करताना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी दिलेली माहिती तपासून पहावी, जसे की, नाव, लिंग, आधार नंबर, जन्मतारीख वडीलांचे/आईचे पूर्ण नाव, सपूर्ण पत्ता : घर क्रमांक, घराजवळची खुण, जन्मतारीख, तालुका, जिल्हा, पिन कोड, मोबाईल क्रमांक ,स्वतःचा, पालकांचा ई-मेल,जात प्रवर्ग आदिम जमाती (Primitive Trib Yes नसल्यास No करावे (महाराष्ट्रात ३ आदिम जमाती/Primitive Tribe १. गाडिया गोठ २. कोलाम. ३ कातकरी) वार्षिक उत्पन्न (वर्ष २०२४-२५ तहसिलदार यांचे उत्पन्न दाखला, रुपये २०,०००/पेक्षा कमी उत्पन्न असल्यास, बीपीएल- प्रमाणपत्र क्रमांक टाकावा.

६.जातीचा दाखला /जात वैधता प्रमाणपत्र, आईवडिलावा आधार क्रमांक, बारकोड उसणारे जात प्रमाण
दिव्यांगाचे प्रमाणपत्र असल्यास शासकीय कार्यालयाचे प्रमाणपत्र/अनाथ असल्यास (महिला व बाल विकास विभागाचे) प्रमाणपत्र.

७) महाविदयालयातील अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा कालावधी, शिक्षण घेत असलेले वर्ष
महाविदयालयातील प्रवेश (प्रवेश पावती प्रमाणे पावती क्रमांक, यापूर्वी वसतीगृहात प्रवेशित असल्यास संपूर्ण तपशिल.)

८) प्रवेश हव्या असलेल्या वसतिगृहाची निवड करावी महाविदयालय व वसतीगृह एकाच शहरात/ गावात असावे.

९) यापूर्वी प्रवेशित झालेल्या शाळा/महाविदयालयाचे नाव अभ्यासक्रम, कालावधी आणि गुण, उत्तीर्ण तपशिल बोर्ड महिणा-वर्ष, बैठक क्रमांक, बैंक खात्याचा तपशिल

**वसतीगृह योजनेचा आणि पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेचा लाभ आधार सलग्न बँक खात्यात वितरीत होणार असल्याने**

१. राष्ट्रीयकृत बँक मध्ये स्वतःचे स्वतंत्र आधार सलग्न बैंक खाते असावे.

२. आधार क्रमांकावरील नावाचे, बँक खात्यावरील नावाचे, अर्जावरील नावाचे स्पेलिंग सारखे असावे,

२. बँक खाते क्रमांक, बैंकेचे नाव शाखेचे नाव बँक IFSC Code (बँक इतर बँकमध्ये विलनीकरण झाली असल्यास अययावत बँक पासबुकची प्रिंट काढुन IFSC Code /MICR Code भरावा.

वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत निवड न झाल्यास पंडित दिनदयाळ स्वयम योजनेस अर्ज वर्ग करणाच्या अनुषंगाने पर्याय YES करावे, आवश्यकता नसल्यास No. करावे No पर्याय निवडणा-या विधार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश न मिळाल्यास स्वयंम योजनेसाठी स्थानातरीत करण्यात येत नाही.

१० . ऑनलाईन अर्ज Submit केल्यानंतर खालील आवश्यक मुळ कागदपत्रे (ORIGINALJUPLOAD करावीत.

१. संपुर्ण आधार कार्ड original (पुढील आणि मागील बजु PDF/JPEG स्वरुपात.
२. जात प्रमाणपत्र आणि (असल्यास जात वैधता प्रमाणपत्र एकत्र Original PDF/JPEG स्वरुपात.

३. महाविदयालय प्रवेश पावती आणि बोनाफाईड सर्टिफिकेट Original, शैक्षणिक खंड असल्यास GAP प्रमाण पत्र जोडावे (एकत्र PDF).

४. वसतिगृह प्रवेशासाठी असल्याबाबत शासकीय वैदयकीय प्रमाणपत्र Original.

५. पालकांचा उत्पन्न दाखला (तहसिलदारांचा नोकरदार पालक From No.४% Original,(आईच्या नावाने उत्पत्र दाखला असेल तर वडिलांचा मृत्यू दाखल्याची प्रत).

६. बँक पासबुक Original स्कॅन करावी.

७. मागील वर्षाच्या परिक्षेचा निकाल Original (दोन सत्रात असल्यास दोन्ही एकत्र प्रत). पासिंग सर्टिफिकेट.

८. सध्याच्या शैक्षणिक प्रवेशापूर्वीचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/TC Original.

९. (Original प्रत महाविदावलयात सादर केली असल्यास प्राचार्यांनी सांक्षाकित केलेली प्रत शैक्षणिक खंड/गैप असल्यास तसे पतिज्ञापत्राची प्रत.

१०.लागू असल्यास दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र अनाथ असल्यास अनाथाचे प्रमाणपत्र

Upload केलेले सर्व कागदपत्रे [Download करुन तपासून पहावीत, Upload केलेली कागदपत्रे स्पष्ट पाहता येणे आवश्यक आहेत. तदनंतर ऑनलाईन Final submit करावे.

११.ऑनालाईन अर्ज करताना काही कागदपत्रे व्यवस्थित Upload झाली नसल्यास किंव्हा चुकीचे कागदपत्र Upload झाले असल्यास Edit Documents हा पर्याय निवडुन कागदपत्रे Upload करावीत.

जुन्या प्रवेशित विदयार्थ्यांना त्यांच्या Upload केलेल्या कागदपत्रांमध्ये बदल करावयाचा असलयास

१२. निवड केलेल्या वसतीगृहात अर्जाची सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर कराव्यात. तसेच वसतीगृहाचा संपर्क क्रमांक  आपल्या दैनंदिनीमध्ये  लिहुन ठेवावा.

१३. ऑनलाईन अर्ज सादर करताना आपण प्रवेशीत असलेल्या महाविदयालयाचे नाव, अभ्यासक्रमाचे नाव संकेतस्थळावर दिसणे आवश्यक आहे, अभ्यासक्रम तपशिल निवड करण्यासाठी दिसत नसेल तर प्रकल्प कार्यालयाशी संपर्क करावा. तदनंतर ऑनलाईन अर्ज सादर करावा,

१४. जुन्या प्रवेशित विदयार्थ्यांचा लॉगिन आय. डी. मोबाईल क्रमांक बंद झाला असलयास त्यांनी अर्ज ऑनलाईन सादर करण्यापुर्वी प्रकल्प कार्यालयाशी संपर्क करुन लॉगिन हे नवीन मोबाईल क्रमांकावर Transfer करून घ्यावे,

१५. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर https://swayam.mahaonline.gov.इन या संकेतस्थळावर लॉगीन करुन अर्जाची सदयस्थिती किमान दर ७ दिवसांनी तपासावी, अर्जात काही चुक झाली असल्यास वसतीगृह/कार्यालयाकडुन कारण लिहुन अर्ज विदयार्थ्यांच्या लॉगिनला Send Back केला जातो, सदर अर्ज कारणाप्रमाणे आवश्यक बदल करुन अर्ज Resubmit करावा.

१६. अर्ज स्तिथी ऑनलाईन प्रणालीवर जाऊन वेळोवेळी तपासणे हि अर्जदाराची / पालकांची जबाबदारी आहे.

१७. नवीन विदयार्थ्यांची वसतीगृह प्रवेश प्रक्रीयेत निवड झालयास, कॉल लेटर Download करुन ७दिवसात वसतीगृहात प्रवेशासाठी हजर व्हावे.

१८. वसतीगृह प्रवेश प्रक्रिया पूर्ण होऊन जागा शिल्लक नसल्यास, सदर विदयार्थ्यांना वसतिगृह स्वंयम योजनेच्या लाभासाठी त्यांचे अर्ज महाविदयालयांकडे स्वंयम योजनेची पात्रता पाहुन वर्ग केले जातात, स्वयंम योजनेच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे विदयार्थ्यांनी ऑनलाईन Upload करुन महाविदयालयास सादर करावीत.

१९. विदयार्थी हे Net Cafe मधुन अर्ज सादर करतात. सदर अर्ज विदयार्थ्यांनी स्व तः तपासुन आवश्यक सुधारणा तात्काळ करुन घ्याव्यात. Net Cafe चालकाच्या चुकीमुळे आपण योजनेच्या लाभांपासून वंचित राहू शकता याची नोंद घ्यावी.

२०. पालकाचे घोषणापत्र आणि विद्यार्थ्यांचे घोषणापत्र नमुना पुढील प्रमाणेच असावा.

# पालकाचे स्वयंघोषणापत्र (शैक्षणिक वर्ष २०२६-२७)

प्रमाणित करण्यात येते कि, मी ______________________ तालुका______जिल्हा ______राहणार_________ रहिवाशी असून माझा पाल्य कुमार/कुमारी______________________याने/हिने -जि.______ या महाविदयालयात_______ या वर्गात प्रवेश घेतलेला असून आमचे कुटुंब महाविद्यालय परिसरात पत्नी/पती रहिवाशी नाही.

मी पत्नी / पती शासकीय सेवेत नाही. हे मी शपथपत्रावर लिहून देत आहे. यात काही माहिती खोटी आढळून आल्यास होणा-या कार्यवाहीस मी व्यक्तिशः जबाबदार राहील.

दिनांकः- / /२०२६

**पालकाचे नाव व स्वाक्षरी.**

# विद्यार्थ्याचे स्वयंघोषणापत्र (शैक्षणिक वर्ष २०२६-२७)

प्रमाणित करण्यात येते कि, मी__________ तालुका_____ जिल्हा ______ येथी रहिवाशी असून माझे कुटुंब देखील याच गावचे रहिवासी आहे. मी__________________या महाविदयालयात या_______ वर्गात दिनांक____________ राहणार____________येथिल रहिवाशी रोजी प्रवेश घेतला असून आमचे कुटुंब महाविद्यालय परिसरात राहत नाही. तसेच अर्ज केलेल्या अभ्यासक्रमा व्यतिरिक्त मी कुठेही नोकरी, व्यवसाय (पुर्ण वेळ किंव्हा अर्धवेळ) करत नाही, किवा करणार नाही. मी पुर्ण वेळ शिक्षण करेल. सदर योजनेसाठी अर्ज मंजुर केल्यानंतर समाज कल्याण विभाग मधील वसतिगृह योजने करीता लाभ घेणार नाही.

वसतीगृह योजनेत मध्ये माझी निवड झाल्यास मी वसतीगृहात प्रवेश घेईल, जर मी वसतिगृहात ७ दिवसात प्रवेश निश्चित केला नाही तर माझा वस्तीगृहातील प्रवेश रद्द होईल याची मला कल्पना आहे तसेच मला स्वयम योजनेमध्ये ही लाभ मिळणार नाही याची पूर्व कल्पना आहे.

हे मी शपथपत्रावर लिहून देत आहे. यात काही माहिति खोटी किंव्हा चुकीची आढळून आल्यास योजनेचा प्रवेस रद्द होऊ शकतो तसेच होणा-या कार्यवाहीस मी व्यक्तिशः जबाबदार राहील व अर्जातील भरलेली माहिति अर्ज मंजूर झाल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही याची जाणीव आहे.

दिनांक: / /२०२६

**विद्यार्थ्यांचे नाव व स्वाक्षरी.**